# Pimpri Chinchwad Police Commissionerate

जा.क्र./पोउआ/वाह/ ५३० /२०२१

**प्रेसनोट** दिनांक - ०३ /०२ /२०२१

चिखली आकुर्डी रस्त्याने केशव नगर नाला ते सत्संग रस्त्याचे कडेला ड्रेनेज लाईन टाकणेसाठी वाहतुकीत बदल करण्यात आले आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी सुधीर हिरेमठ (भा.पो.से), पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, सदर कामाकरीता दिनांक ०४/०२/२०२१ पासुन ३१/३/२०२१ पर्यंत खालील प्रमाणे वाहतुकीत तात्पुरते बदल करण्यात येत आहेत.

## तळवडे वाहतुक विभाग अंतर्गत

१. चिखली गाव चौकाकडुन साने चौकाकडे जाणारी वाहतूक चिखली गाव चौक ते पंचवटी नेस्ट ही सोसायटी केशवनगर नाल्यापर्यंत पुर्णतः बंद करण्यात येणार आहे.

पर्यायी मार्ग :- पाटीलनगर चौक ते सोनवणेवस्ती रोड मार्गे सत्संग समोरुन साने चौकाकडे ,त्याचप्रमाणे साने चौकाकडुन चिखली गावाकडे येणारी वाहतूक ही सत्संग समोरुन सोनवणेवस्ती रस्त्याने पाटीलनगर चौक मार्गे वळविण्यात येणार आहे.

Shrimath

(सुधीर हिरेमठ)भा.पो.से.
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
नविन मध्यवर्ती इमारत, पुणे — ०१

प्रत:-

१)पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड शहर.

३) पोलीस निरीक्षक पिंपरी वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड शहर.

४) कार्यकारी अभियंता, फ क्षेत्रीय विभाग,जलनि:सारण विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका
२/- सदर ठिकाणी वरील वाहतूक वळविणारे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.




पिंपरी-चिंचवड पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय